RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक २८] मंगळवार, एप्रिल १९, २०२२/चैत्र २९, शके १९४४ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

शहर विकास विभाग,

**जाहीर सुचना**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये )**

क्र. ठामपा/मुख्या.१/शविवि-२९/वियोअंक/१०९

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/१२९७/१३१९/सी.आर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टिपीएस/१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल २००३ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १४ मे २००३ पासून अंमलात आली आहे. (यापूढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे ;

आणि ज्याअर्थी, कळवा प्रभाग समितीमध्ये कळवा, खारेगाव, पारसिक ही गावे असून, महामार्गाने अंजुरदिवे, मानकोली इत्यादी परिसरही वाहतुकीच्या दृष्टीने जोडलेला आहे. या परिसरात राहणारे नागरिक मोठ्या प्रमाणावर मुंबई महानगर क्षेत्रात नोकरी व कामधंदा निमित्त मध्य रेल्वेच्या कळवा रेल्वे स्थानकातून लोकल ट्रेनने प्रवास करतात. अशा प्रवास करणाऱ्यांची संख्या दर दिवशी जवळपास ३ ते ३.५० लाख आहे. यापैकी कळवा पूर्व भागात जाणारे प्रवासी वगळता बहुतांश प्रवासी हे कळवा पश्चिम येथे येऊन त्यांचे इच्छित स्थळी जातात. कळवा पश्चिम बाजूस रेल्वे स्थानकापर्यंत अरुंद रस्त्यामुळे कोणतीही सार्वजनिक बस वाहतूक सुविधा नाही. तसेच अरुंद रस्त्यामुळे कळवा स्थानकापासून मुंबई-पुणा रस्त्यापर्यंतच्या वर्दळीस मोठ्या प्रमाणावर अडथळा होत आहे.

त्याअर्थी, सदरहू रस्त्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता कळवा रेल्वे स्थानक ते मुंबई-पुणा रस्ता (सहयाद्री विद्यालय) ३० मी. रुंदीचा दर्शवून विकास योजना रस्ता म्हणून समाविष्ट करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित केलेला आहे. सदर फेरबदलाची कार्यवाही करणेकरिता मा. महासभा ठराव क्र.७००, दिनांक ३ मार्च २०२२ अन्वये मान्यता दिलेली आहे. (यापुढे " उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे.)

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार "उक्त मंजूर विकास योजनेत उक्त फेरबदलाबाबत" जनतेच्या सुचना / हरकती मागविणेसाठी ही जाहिर सुचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक, नगररचना, शहर विकास विभाग, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सुचना फलकावर तसेच ठाणे महानगरपालिकेचे संकेत स्थळ www.thanecity.gov.in या नमूद संकेत स्थळावर ठेवण्यात आली आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सुचना / हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व www.thanecity.gov.in या संकेत स्थळावर आणि **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासुन ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना / हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे सादर करावी.

**स. पं. उगिले,**
सहायक संचालक, नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक : १८ एप्रिल २०२२.

## THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

### Town Planning Department

### Notice

### (U/s. 37 of Maharashtra Regional & Town planning Act,1966)

No. TMC/ Hq.1/TDD-29/ DPIC/109

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been Sanctioned by Government *vide* Notification No. TPS/1297/1319/CR-148 /97 /UD - 12, Dt. 4th October, 1999 & came into force from 22nd November, 1999. Also the Excluded portion (EP) from Revised Development plan were sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/UD-12, Dt. 3rd April, 2003 & came into force from 14th May, 2003 (Herein after referred to as " The said Sanctioned Development plan ") ;

And Whereas, Kalwa Railway station is connected to Kalwa, Parsik, Kharigaon villages situated in Kalwa Prabhag Sammittee and also connected by Highway to Ajurdive, Mankoli etc. villages. Citizens residing in these areas commute from Kalwa Railway station to Mumbai and other parts of MMR region for their service and business. Daily Commuters travelling from Kalwa Railways Station are approx. 3.0 to 3.50 Lakh, most of the commuters are travelling from Kalwa West to their destinations. Due to narrow roads connected to Kalwa Railway station from west side and heavy commuter movement during peak hours creates traffic congestions in Kalwa Village.

And therefore, it is necessary to follow the procedure of modification laid under Section 37(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 in Sanctioned Development Plan to show the above proposed 30.00 mt. road in Development Plan from Kalwa Station to Mumbai-Pune Road (herein after referred to as " The said modification ") Hon. General Body of Thane Municipal Corporation *vide* its Resolution No 700, dated 3rd March 2022 has accorded sanction for the above said procedure of modification.

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out " The said Modification in said sanctioned Development Plan " as per the provisions under section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act 1966. The Plan showing said modification in " said sanctioned Development plan " is displayed on the notice board in the office of Assistant Director, Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation, Dr. Almeida Road, Panchpakhadi, Thane and on website mentioned below. Any person interested may submit his suggestion or objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper, on the website www.thanecity.gov.in and *Maharashtra Government Gazette*, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

S. P. UGILE,
Asst. Director, Town planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
Dated : 18th April 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.